गुरुवार दि.१५ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३४७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# पवार कुटुंबात मनोमिलन होणार ?: 'दादा'ने मागितला असता तर पक्ष, चिन्ह दिले असते

## अजित पवारांच्या विधानावर सुप्रिया सुळेंची प्रतिक्रिया

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धाराशिव (वृत्तसंस्था)**

बारामती लोकसभा मतदारसंघात बहिणीविरोधात बायकोला उमेदवारी देऊन चूक झाल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी मान्य केले. आता त्यांच्या या विधानावर त्यांच्या भगिनी खासदार सुप्रिया सुळे यांनीही सकारात्मक साद दिली आहे. मी वर काय घेऊन जाणार? खाली हाथ आए थे, खाली हाथ जाएंगे. भावाने मागितला असता तर मी माझा पक्ष व चिन्हही दिले असते, असे त्या म्हणाल्यात. त्यांच्या या विधानामुळे पवार कुटुंबाचे पुन्हा मनोमिलन होणार का? असा सवाल प्रश्न उपस्थित होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा बुधवारी धाराशिवमध्ये पोहोचली. तिथे झालेल्या एका सभेत सुप्रिया सुळे यांनी उपरोक्त विधान केले. महायुती सरकारने भावा-बहिणीच्या नात्याची १५०० रुपये किंमत लावली आहे. भावाने मागितले असते तर मी माझा पक्ष व चिन्ह सर्वकाही देऊन टाकले असते. मी वर काय घेऊन जाणार? खाली हाथ आए थे, खाली हाथ जाएंगे. माझा पक्ष फुटला नाही, तर तो हिसकावून नेण्यात आला आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

बारामती लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्याविरोधात सुनेत्रा पवारांना उमेदवारी देऊन आम्ही मोठी चूक केली, अशी स्पष्ट कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी मंगळवारी दिली होती. राजकारण हे पार घरामध्ये शिरू द्यायचे नसते. पण त्या बाबतीत माझ्याकडून काहीशी चूक झाली, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानानंतर सुप्रिया सुळे यांनी हे विधान केले आहे.

सुप्रिया सुळे यांनी यावेळी लाडकी बहीण योजनेचे पैसे परत घेण्याची भाषा करणाऱ्या आमदार रवी राणा यांच्यावरही निशाणा साधला. माझे आव्हान आहे की, तू एकाही बहिणीचे पैसे परत घेऊन दाखव. त्यानंतर



पाहा मी काय करते? डिसेंबर महिन्यात लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी यादीची स्क्रूटिनी होणार हे कुणालाही माहिती नव्हते. मलाही माहिती नव्हते. पण त्यांना कसे कळले? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी या प्रकरणी उपस्थित केला.महायुतीच्या सरकारने भावा-बहिणीच्या नात्याची १५०० रुपये किंमत लावली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा पैसा बहिणीच्या ओवाळणीचा असल्याचे म्हटले आहे. पण हे पैसे ते त्यांच्या खिशातून देणार आहेत का? जीएसटी घेता, टॅक्स घेता, खते, तांदूळ, हॉटेलात जेवले तरी कर घेता, मग या योजनेचे पैसेही तुम्ही खिशातून देता का? असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.लाडकी बहीण योजनेवर दोन आमदारांनी विरोधाभासी विधान केल्यानंतर सरकारमधील नेते चिडले होते. त्यामुळे ते जळगावात चिडून - चिडून भाषण करत होते. याचा अर्थ त्यात काहीतरी गोलमाल आहे. लाडकी बहीण योजनेला निधी कुठून आणला? काही पत्रकारांनी या योजनेचा निधी डीपीडीसीमधून वळता केल्याचा दावा केला. या प्रकरणी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मार्गदर्शन करावे. कारण ते अनेकवर्षे राज्याचे अर्थमंत्री होते, असेही सुप्रिया सुळे यावेळी बोलताना म्हणाल्या.

# ई-पिक पाहणी करूणही ई-पिक यादीत शेतकऱ्यांचे नाव नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

नांदगांव येथील शेतकरी पुरभाजी गंगाराम भरकडे यांनी २०२३ खरीप हंगामामध्ये ई-पिक पाहणी केली होती परंतु कृषी विभागाच्या वतीने मारतळा येथील ग्रामपंचायत कार्यालयाचा बोर्डावर लावण्यात आलेल्या यादीमध्ये शेतकरी पुरभाजी भरकडे यांचे नाव नाही तेव्हा जिल्हा कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन देऊन नाव समाविष्ट करून शासनातर्फे देण्यात येणारे अनुदान देण्यात यावे अशी मागणी शेतकरी पुरभाजी भरकडे यांनी केली आहे.सातबारावर ई -, पिक पाहणी नोंदणी ऑनलाईन केलेली आहे.शासनाकडून शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते आहे.सातबारा वर ई-पिक नोंद असलेल्या बऱ्याच शेतकऱ्याची नावे कृषी




विभागाच्या यादीत आलेली नाहीत त्यामुळे शासनाने सर्व शेतकऱ्यांचे नावे समाविष्ट करून सर्वांना अनुदानाची आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.


# वंशाला दिवा पाहिजे ही माणसीकता समाजाने बदलायला हवी, स्त्रीभ्रूणहत्या समाजातली कीड-न्यायाधीश एस.एन.निकम

## तांबाराजुरी येथे कायदे विषयक शिबिर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा | प्रतिनिधी**

दिनांक १३/०८/२०२४ मंगळवार रोजी तांबाराजुरी येथे विधी सेवा समिती पाटोदा व वकिल संघ पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री भ्रूण हत्या आणि इतर प्रचलित सामाजिक दुष्कृत्ये, पिडीत भरपाई योजना, हुंडा आणी जातीभेद ई. कायदे विषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मा.दिवाणी न्यायाधीश पाटोदा श्रीमती एस.एन.निकम मॅडम या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या या वेळी त्यांनी स्त्री भ्रूण हत्या आणि इतर प्रचलित



सामाजिक दुष्कृत्ये या विषयी उपस्थितांना उत्कृष्टरित्या मार्गदर्शन केले. वकील संघातील विधिज्ञ श्री.एस.एन.घुमरे यांनी पिडीत भरपाई योजना या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच पाटोदा वकील संघाचे विधीज्ञ श्री.एस.बी.कोकाटे यांनी हुंडा आणि जातीभेद बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कायदे विषयक शिबिराचे प्रास्ताविक व सूत्र संचालन तसेच शेवटी सर्वांचे आभार प्रदर्शन विधीज्ञ श्री. एस.बी.जावळे यांनी केले. या कार्यक्रमास वकील संघाचे अध्यक्ष विधीज्ञ श्री.एस.एस.कोठेकर साहेब हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विधीज्ञ श्री.एन.जी. जाधव, विधीज्ञ श्री.यू.बी.जाधव, विधीज्ञ श्री. ए.एस.वैद्य, विधीज्ञ श्री. एस.एन.घूमरे, विधीज्ञ श्री. एस.बी जावळे, विधीज्ञ श्री. एस.बी.थोरवे, विधीज्ञ श्री. एस.आर.नागरगोजे, विधीज्ञ महेश बेदरे व पाटोदा वकील संघाचे इतर सदस्य, विस्तार अधिकारी बी.एस.राख साहेब, गावातील सरपंच ज्योती तांबे मॅडम, ग्रामसेवक वाघुले साहेब, तसेच तहसिल कार्यालयातील तलाठी मॅडम श्रीमती भारती दांडगे, गावातील नागरीक या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नोकरी महोत्सवामध्ये युवकांनी सहभागी होऊन रोजगाराची संधी प्राप्त करावी-अंकिता पाटील- ठाकरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**

जिजाऊ फेडरेशनच्या वतीने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर येथील कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये शुक्रवार दि.१६ ऑगस्ट रोजी भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन केले आहे.या नोकरी महोत्सवामध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यरत ५० पेक्षा जास्त कंपन्या सहभागी होऊन युवकांना रोजगार प्राप्त करून देणार आहेत.विविध विद्याशाखेतील युवक युवतींनी आपल्या आवश्यक कागदपत्रासह सहभागी होऊन या नोकरी महोत्सवातच आपली रोजगाराची संधी निश्चित करावी असे आवाहन पुणे जिल्हा भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अंकिता पाटील-ठाकरे यांनी केले आहे.

रेड्डी फाऊंडेशन,बजाज ऑटो,टाटा



मोटर्स,भारत गियर्स,डूथ ऑटोमेटिव्ह,क्सिस बँक, मुटूथ फायनान्स,एलआय सी,रॉयल इन्फोटेक, जिनियस कन्सल्टंट,आर सिक्युरिटीज अर्णव इन्फो यासारख्या ५० पेक्षा जास्त कंपन्या या नोकरी महोत्सवामध्ये सहभागी होऊन युवकांना रोजगार उपलब्ध करून देणार आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते १६ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता होणार आहे. यावेळी युवा नेते राजवर्धन पाटील आणि ईतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# वाळूच्या दोन ट्रॅक्टरवर तहसिलदार खोमणे यांची कार्यवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई | प्रतिनिधी**

**आठ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त**

तालुक्यातील आगर नांदूर तसेच नागझरी परिसरातून वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरवर गेवराई महसूल प्रमुख संदिप खोमणे यांनी कार्यवाई केली असून अंदाजे आठ लक्ष रुपयांचा मुद्देमाल या कार्यवाईत जप्त करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,जूनी नाकझरी तसेच आंगर नांदूर या ठिकाणा वरूण अवैध वाळू उत्खनन करूण त्यांची ट्रॅक्टर च्या माध्यमातून वाहतूक केली जात आहे अशी माहिती गूप्त बातमी दाराने तहसिलदार संदिप खोमणे यांना दिली तसेच त्यांनी या परिसरात जाऊन दोन्ही ट्रॅक्टर ताब्यात घेत तहसिल कार्यलयात लावण्यात आले आहेत सदरच्या ट्रॅक्टरवर दंडात्मक कार्यवाई करणार असल्याचे देखील तहसिलदार संदिप खोमणे यांनी सांगितले आहे.



**झाडे लावा झाडे जगवा**


## चारोळी

देशासाठी अर्पिले प्राण
केले सर्वस्वाचे दान
त्याच्या या त्यागापुढे
झुकते आपोआप मान.

रंजना सानप
मायणी (सातारा)




१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त दै.लोकनेता कार्यालयास सुट्टी असल्यामुळे उद्याचा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचकांनी नोंद घ्यावी —व्यवस्थापक






# भारतीयांनो, स्वातंत्र्य दिनी सावधान...!

लोकनेता न्यूज नेटवर्क

स्वतंत्र, सार्वभौम, संसदीय लोकशाही राष्ट्र हे शब्द अनमोल आहेत. भारत स्वातंत्र्याच्या शंभरीकडे वाटचाल करत आहे याचा अभिमान आहे. दीर्घकालीन लोकशाही भारतात सातत्याने अनंत घडामोडी घडत असतात. अनेक भाषा, प्रांत, संस्कृती, पक्ष, विचारसरणी, इत्यादी विविधतेने नटलेल्या भारतात सगळे आनंदाने, गुण्यागोविंदाने नांदत आहेत हि निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. देशांतर्गत घडामोडी आणि जगात सुरु असलेले छोटे-मोठे संघर्ष याचा साकल्याने विचार करतांना आपण देश म्हणून नेहमी अत्यंत बारकाईने स्वअवलोकन केले पाहिजे. देशांतर्गत राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्तरावर अनेक फेरबदल होतांना इथल्या विचारवंत, लेखक, कवी इत्यादी सर्जनशील धुरिणांनी खऱ्या अर्थाने देश पुढे घेऊन जायचा असतो. सत्तास्थाने बदलत असतांना देश केंद्रस्थानी ठेवून स्थित्यंतरे होत राहिली पाहिजेत. त्यावर सडेतोड भाष्य झालेच पाहिजे.



प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर
महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८

स्वातंत्र्य दिन साजरा करतांना वैचारिक चिंतन-मंथन झाले पाहिजे. काश्मीर पासून ते कन्याकुमारीपर्यंत विशालकाय देश एकसंध ठेवताना सर्वांनाच जबाबदारीने काम करावे लागणार आहे. शिक्षक या नात्याने सरकारने देशातील शालेय शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतची धोरणे मोठ्या जबाबदारीने राबवावी लागणार आहेत असे मला प्रकर्षाने सांगायचे आहे. या बाबतीत केंद्र सरकारची जबाबदारी मोठी आहे. उच्च शिक्षण केंद्रसूचीतील आणि पूर्व प्राथमिक ते माध्यमिक पर्यंतचा शालेय शिक्षण हा समवर्ती सूचीतील महत्वपूर्ण विषय आहे. तेंव्हा केंद्र सरकार देशातील सर्वच शिक्षणाला दिशादर्शक महत्वपूर्ण केंद्र आहे. जगात अनेक धुरिणांनी शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व दिले आहे. स्वातंत्र्यपूर्व भारतात ज्योतीराव आणि सावित्रीबाई या फुले दांपत्याने केवळ शिक्षणासाठी संपूर्ण हयात खर्च केली.विद्ये विना मती गेली। मती विना निती गेली।।आणि मानवी जीवनातील सारे अनर्थ केवळ अविद्येमुळेच झालेलिहून समाजाची झणझणीत कान उघडणी केली. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी कृतीने याला हत्तीचे बळ दिले. सर्वच जातीच्या गोर, गरीब, वंचीत, उपेक्षित, बलुतेदार विद्यार्थ्यांसाठी नि:शुल्क निवासी वसतिगृहे उभारून गावागावात ज्ञानगंगा पोहोचविण्याचे महत्कार्य केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जो प्राशन करेल तो गुरुगुरल्याशिवाय राहणार नाही लिहून येणाऱ्या पिढ्यांना जागृत केले. आफ्रिकेत क्रांतिकारी नेल्सन मंडेला, शिक्षण हेच जग बदलवण्याचे सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे असे लिहून आधुनिक जगाला शिक्षणाकडे लक्ष द्यायला सांगतात. कोणत्याही देशाला खऱ्या अर्थाने शिक्षणच घडवत असते हे लक्षात घ्यायला हवे. शिक्षण क्षेत्र देशाच्या सर्वांगीण विकासाची दिशा निश्चित करत असते. त्यासाठी देशातील सर्वच घटकांनी जसे पालक, संस्था, संशोधक, शास्त्रज्ञ, शिक्षक, सरकारे, विचारवंत इत्यादी महत्वपूर्ण घटकांनी यावर बारकाईने चिंतन-मंथन करायला पाहिजे. त्यासाठी साकल्याने प्रयत्न व्हायलाच हवेत. आज संपूर्ण देशभर नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० लागू झाले आहे. एकीकडे जगाच्या १०० विद्यापीठाच्या यादीत येण्यासाठी भारताची धडपड असतांना दुसरीकडे दुर्गम भागात सरकारी शाळा बंद होताहेत. अनेक गावात शाळेत ये-जा करायला अजून रस्तेच नाहीत. असे भयावह चित्र असतांना शासनातील जबाबदार मंडळी जसे



जिल्हाधिकारी, खासदार, आमदार, तहसीलदार इत्यादी साहेब लोक काय करताहेत? यांना हे सगळे माहित असतांना अजूनही तिथे सुविधा पोहोचत नसतील तर पाणी कुठे मुरत आहे? याला नेमके कोण जबाबदार? माय-बाप मतदार लोकहो, याला तुम्ही पण तेवढेच जबाबदार आहात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, जो पर्यंत देशातील निवडणुका जात, धर्म, पंथ, पैसा इत्यादीवर होतील तोपर्यंत देश विकसित होणार नाही. विचार करा, खरंच आपला प्रवास महासत्तेच्या दिशेने कि अधोगतीच्या दिशेने सुरु आहे?

आहे रे आणि नाही रे हा जगातील जुनाच संघर्ष आहे. एकीकडे सरकारे मतदारांना लुभावणाऱ्या नवनवीन योजनांची खैरात वाटतांना तरुणांचे तांडे मात्र बेकार फिरत आहेत. आत्ताच पोलीस भरती पार पडली. विविध पदवीधारक जसे एम.ए., बी.एड., पीएच.डी., इंजिनिअर, फार्मासिस्ट इत्यादी उच्च शिक्षित तरूण पोलीस भरतीच्या रांगेत होते. तरुणांचा देश म्हणून जगात भारताची ओळख असताना सरकारने या तरुणांच्या हातांना किमान सहा तास काम आणि त्या बदल्यात योग्य वेतन देणे हि प्राथमिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. सर्वच सरकारांनी रोजगाराभिमुख धोरणे राबवणे आज काळाची गरज आहे. एकीकडे लोकांना १.५० जीबीचे व्यसन लावून रिचार्जच्या प्रचंड किमती का वाढवल्या(?) माहिती नाही, परंतु त्यामुळे लोकांची जीभ बाहेर आली आहे.सर्वांनीच सखोल आणि दूरवर विचार करण्याची वेळ आहे. एखादा आजार वेळीच उपचार केले नाही तर बळावत जातो, त्या न्यायाने आज स्वातंत्र्य दिनी आपणाला विचार करण्याची महत्वपूर्ण वेळ आली आहे. समय वाहत असतो. अनेकांची श्रीमंत विरासत संपली आहे, परंतु महापुरुषांची जागा जैसे थे आहे. सरकारे विविध लोकलुभावन योजना जाहीर करत आहेत. लोकांना मोफतची सवय लावणे निश्चितच स्वागतार्ह नाही, त्यामुळे लोक आळशी बनताहेत. श्रमाचे मूल्य घटते आहे. माणसाला फुकटाची किमंत नसते. या सवंग योजना सत्ताधाऱ्यांच्या स्वतःच्या स्थावर-जंगम मालमत्तेतून देत नाही हे हि तेवढेच सत्य! याचा सरळ ताण देश-राज्याच्या तिजोरीवर पडतो आहे. ह्या योजना म्हणजे तात्पुरती मलमपट्टी! असे न करता सरकारांनी दूरगामी आणि मूलगामी धोरणे अवलंबावी लागतील. रोजगार द्यावा लागेल. घामाचे दाम कमवायची तजवीज करावी लागेल. ऐतखाऊ प्रवृत्तींना आळा घालावा लागेल. त्यासाठी कृषिप्रधान भारतात सर्वात प्राधान्याने शेतमालाच्या आधारभूत किमती वाढवाव्या लागतील. कोणतीही माफी-बीफी आणू नये. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था रसातळाला जात आहे. इमानदारीने सर्वेक्षण करून आर्थिक दुर्बल, निर्वासित, बेघर लोकांना घरे द्यायलाच पाहिजेत. बळी तो कानपिळी बंद झाले पाहिजे. ज्यांच्याकडे जळता जळत नसतांना त्यांच्याच खात्यावर लाखोंच्या रकमा आणि खरे गरजवंत अजूनही पालात, झोपडीत; गावोगाव भटकंती करत पोटाची खळगी भरत आहेत. डोंबाऱ्याचा खेळ थांबलाच पाहिजे. मसणजोगी, कुडमुडे गोसावी, फासेपारधी पक्क्या घरात राहिले पाहिजेत. का, त्यांचा देश नाही का? इथे सरकारे काहीच काम करत नाहीत का?

असे असले तरी आपण चांगलाच मोठा पल्ला गाठला आहे. भरपूर सुधारणा झाल्या आहेत. तरीही दिवसेंदिवस जात, धर्माची कट्टरता फोफावत आहे. देश या संकल्पनेला या बाबी मारक आहेत. संवैधानिक मार्गांनी आपल्या मागण्या किंवा विरोध हे लोकशाहीचे प्रभावी शस्त्र आहे, आणि ते वापरलेच पाहिजे. असे असतांना राजकारणी आणि श्रीमंत वर्गाने मांजरासारखे डोळे झाकून दुध पिऊ नये. संपत्तीचा उच्चांक सार्वजनिक होत आहे. इंटरनेट, मिडीयाने पोलखोल झाली आहे. त्यासाठी सत्ताधाऱ्यांनी रसिया-युक्रेन युद्ध, अस्वस्थ श्रीलंका आणि नुकतेच बांगलादेशचे रण लक्षात घेऊन धोरणे राबवण्याची युद्धजन्य वेळ आली आहे. उच्च शिक्षित तरुण हातांना काम द्यावेच लागेल, आणि मग हेच तरुण आपली लोकशाही सन्मानाने खांद्यावर घेऊन नाचत नाचत शंभरीकडे घेऊन जातील. देश प्रेम, जिव्हाळा, एकोपा, आपुलकी इत्यादी मानवीय मूल्यांच्या आधारे गुण्यागोविंदाने नांदेल यात तिळमात्र शंका नाही! भारतीय स्वातंत्र्यदिन चिरायू होवो!

# डॉ.अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळाला पाहिजे–आ.नामदेवराव ससाने

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

साहीत्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळाला पाहिजे व समाजाच्या विविध मागण्यासाठी आपण प्रयत्नशील करणार असल्याचे मार्गदर्शन आमदार नामदेवराव ससाने यांनी केले आहे.

नांदेड जिल्हा लसाकम तर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सेवानिवृत्तांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघातर्फे आयोजित जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन भवन येथे गुणवंत पाल्यांचा सत्कार व सेवानिवृत्तांचा सत्कार सोहळा व समाज प्रबोधनचा कार्यक्रम दि ११ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष लसाकमचे महासचिव गुणवंतजी काळे, उदघाटक लसाकमचे प्रदेशाध्यक्ष संजय गायकवाड, प्रमुख वक्ते म्हणून लसाकमचे मार्गदर्शक प्रा.डॉ.दयाराम मस्के, विशेष अतिथी म्हणून प्रा. डॉ. भगवानराव वाघमारे सर ,स्वागत अध्यक्ष विजय रणखांब, विशेष अतिथी डॉ.डी.एम.नेटके, प्रमुख पाहुणे शिवा कांबळे,डी एम तपासकर, केशव मालेगावकर , चंद्रकांत मेकाले अण्णा साहेब तोडे, शिवाजीराव टोम्पे, मल्हारराव तोटरे, सचिन आठवले उपस्थित होते.उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार नामदेवराव ससाने यांनी डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे जीवन चरित्रावर प्रकाश टाकला व डॉ. अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान मिळावा यासाठी



सर्वत्र प्रयत्न करेन असे प्रतिपादन केले. तसेच मुंबई विद्यापीठास डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नाव मिळावे यासाठीही आपण प्रयत्न करू. मातंग समाजाची सर्वात मोठी मागणी अ ब क ड वर्गीकरण ही आहे तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्र सुरू करण्यासाठी पाठपुरावा करू असे त्यांनी नमूद केले.

लसाकमचे प्रदेशाध्यक्ष संजय गायकवाड यांनी लसाकम ही कर्मचाऱ्यांसाठी व समाजासाठी लढणारी संघटना आहे आपला सर्वांनी समाजासाठी लढा उभारल्यानंतर सहकार्य करावे व आपली लढाई आता सुरू झालेली आहे समाजाच्या विविध मागण्यासाठी आपण लढा सुरू आहे तो लढा यशस्वी करण्यासाठी आपण प्रयत्न करण्याचे आवाहन प्रा संजय गायकवाड यांनी केले. स्वागताध्यक्ष विजय रणखांब यांनी स्वागतपर भाषणात आपल्या समाजाने अण्णाभाऊंचे साहित्य वाचले पाहिजे त्यांना समजून घेतले पाहिजे, लसाकम ही वैचारिक चळवळ असून समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करणारी एक सामाजिक संघटना आहे. लसाकम ही संघटना समाजाला आणि विविध क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना संरक्षण देते. मातंग समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे ते म्हणाले. लसाकमने यापूर्वीच शिक्षणाविषयी विविध ठराव घेऊन त्याप्रमाणे लसाकम आपली कार्य करत आहे जेणेकरून समाज शिकावा, घडावा आणि प्रगतशील व्हावा.कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री गुणवंत काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी समाजास योग्य प्रबोधन करून समाज कसा जागृत होईल व समाजाची उन्नती कशी होईल याकडे आपण लक्ष देणे गरजेचे आहे असे त्यांनी नमूद केले. आणि मातंग समाजाला योग्य दिशा देण्याचे काम लसाकम हे विविध सामाजिक कार्यक्रमातून करत असते.प्रमुख वक्ते प्रा.डॉ.दयाराम मस्के यांनी टाकाऊ पासून टिकाऊ माणसे निर्माण करणे म्हणजे अण्णाभाऊ साठे होय. नीतीमूल्यात जगणं आणि वागणं आत्मसात केले पाहिजे. तसेच उजेडात न्यावयास अंधाराची भूक भागली पाहिजे असेही त्यांनी आपल्या भाषणांमध्ये नमूद केले. प्रा. डॉ . भगवान वाघमारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यामध्ये त्यांनी गावासाठी अनुसूचित जातीसाठी शिवाजी महाराजांचे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज यांच्या विचारधारा या माणसाला व समाजाला बदलू शकतात असे त्यांनी प्रतिपादन केले. प्रा. धाराशिव शिराळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले आपल्या मनोगतांमध्ये त्यांनी माणसाने स्वतःची प्रगती करता करता समाजाची प्रगती करावी असे आवर्जून सांगितले. शिवा कांबळे यांनी लसाकमला वेळोवेळी सहकार्य करणाऱ्या सर्व कर्मचारी बांधवांचे आभार मानले. आपल्या सर्वांची ही लढाई आहे म्हणून सतर्क व्हावे असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आयोजक लसाकम जिल्हा सचिव श्री. पी.एम. सूर्यवंशी, श्री. लक्ष्मणराव वाघमारे, श्री.एम. के. घोडजकर, श्री. बालाजी गुंडले, श्री. चंद्रकांत भांडवले, श्री. शिवाजी मोरे, श्री. डी.आर. गायकवाड, श्री. एस एन गजले, श्री. सुनील कांबळे, प्रा. डॉ. एन. के. वाघमारे, श्री. प्रशांत भिसे तसेच जिल्हा संघटक श्री. बालाजी गवाले, श्री. एम.एम. बसवंते, श्री. बाळासाहेब लोंढे आणि आकाश टोमके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पी.एम सूर्यवंशी यांनी केले तर आभार लक्ष्मण वाघमारे यांनी मानले. या सत्कार सोहळ्यात एमबीबीएस इंजीनियरिंग दहावी बारावी च्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला .या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात समाज बांधव गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्रात जातीनिहाय जनगणना करण्याची तहसील दारा मार्फत मुख्यमंत्र्याला निवेदन–येईलवाड

## अंतरवासी डॉक्टरांना शासकीय प्रमाणे स्टयफंड द्या वैद्यकीय शिक्षण मंत्र्याकडे मागणी


लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

७ ऑगस्ट हा दिवस ओबीसी साठी मंडळ कमिशन दिवस आहे,म्हणून महाराष्ट्र राज्याची तात्काळ जातीनिहाय जनगणना करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे महाराष्ट्र राज्याचे ओबीसी उपाध्यक्ष रामचंद्र येईलवाड यांनी केली.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्रभर निवडणुकीचे वारे वाहत असून अनेक उमेदवार विधानसभा लढवण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बाधून तयार आहेत,ओबीसीचा प्रवर्ग होणे ही काळाची गरज आहे,एस सी एस टी प्रमाणे लोकसभा व विधानसभेत ओबीसीला लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मिळायला पाहिजे.१००% मंडल आयोग लागू झाला पाहिजे आणि ओबीसीचा प्रवर्ग झाला पाहिजे त्याचबरोबर समाजामध्ये द्वेष होता सुद्धा कामा नये व सामाजिक दुफळी हे सुद्धा होता कामा नये,संविधानाने सर्वांना समानतेचा अधिकार दिलेला आहे,त्यामुळे आपण सर्वजण एकत्र गुण्यागोविंदाने नांदत आहोत,त्यामुळे प्रगती होणार नाही कुणाची.विकासाच्या गप्पा मारणारे हे कमिशन वाल्यांचा विकास होतो आहे दोन महिन्या खाली टाकलेले डांबर चा रस्ता मात्र उकळून जात परंतु जनतेचा विकास माणसाचा विकास कधी होणार आहे हे लक्षात घेण्याची गरज आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात दि,११ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यावेळी ते म्हणाले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कंधार चे तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याची जातीनिहाय



जनगणना करून आर्थिक,सामाजिक,राजकीय न्याय द्यावा यासाठी मागणी केली.संविधानिक समानता प्रस्थापित करण्याचा एकमेव उपाय म्हणजे जातीनिहाय जनगणना हाच आहे असे ते यावेळी म्हणाले.सर्वांना समान शिक्षण या नावाखाली सरकार कडून देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या सुविधा अनुदान यामध्ये मात्र भेदभाव करत असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्यात एमबीबीएस व बीएएमएस दोन्ही अभ्यासक्रमासाठी समान नियम आहेत.शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या डॉक्टर विद्यार्थ्यांना अंतरवासी शिक्षण सुरु असतांनाच शासन १८ हजार रुपये स्टायफंड देते. त्याचप्रमाणे खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर विद्यार्थ्यांना स्टायफंड देण्यात यावी. अशी रामचंद्र येईलवाड यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे एका पत्राद्वारे मागणी केली आहे,अतिशय गोर-गरीबीतून आपल्या संसाराचा गाडा हाकत आपल्या पाल्याला डॉक्टर बनविण्याचे स्वप्न पालक पाहतात.समान शिक्षण,रुग्णांची समान सेवा करीत असतांनाच शासकीय व अशासकीय असा भेद करणे चुकीचे आहे.त्यामुळे या धोरणात बदल करावा.जेणेकरुन पाल्याच्या डॉक्टर बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या पालकांना या धोराणाचा फायदा होणार असे येईलवाड म्हणाले,

# भारतीय स्वातंत्र्याची ७८ वर्षे पण आजही काही मुद्दे दुर्लक्षित माहिती तथा सामजिक कार्यकर्ते श्री.बाबु भिमराज देवकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

स्वतंत्र भारताच्या ७८ वर्षांचे विश्लेषण करताना बहुतेक जण केवळ गेल्या तीन दशकांच्या इतिहासाचा दाखला देत आहेत. या कालावधीत भारतात झालेले परिवर्तन हे कल्पनातीत आहे, यावर भर देण्यात येत आहे.

राजकीय क्षेत्रात विचारसरणीवर आधारलेल्या पक्षांची वाताहत झाली असून.नेतानिष्ठ पक्ष हे निवडणुकीचे यंत्रणा म्हणून फक्त काम करू लागले आहेत. नोकरशाहीत भ्रष्टाचार वाढला असून सर्वसामान्य नागरिकांना सरकारी योजनांचा लाभ मिळणे दिवसेंदिवस कमी झाले आहे समाजात आत्मकेंद्रीपणा व सुखलोलुपता यांना उत येऊ लागला आहे त्याची गंभीरपणे दखल घेऊन समानता व समता या मूल्यांची जोपासना करणे हे आपले परम कर्तव्य आहे. याची जाणीव नव्या पिढीला करून देणे गरजेचे आहे स्वातंत्र्य मिळवल्यानंतर देश म्हणून उज्वल भविष्याच्या दिशेने वाटचाल करत असताना उपयोगी ठरेल.गेल्या ७८









वर्षात आपण काय कमावले व काय बिघडू लागले याचा लेखाजोखा करणे उज्वल भविष्याच्या दिशेने उपयोगी ठरेल.लँडलाइन कनेक्शन मिळविण्यासाठी खासदाराकडे अनेक खेपा घालाव्या लागल्या होत्या,गॅस कनेक्शन मिळविण्यासाठी अनेक महिने प्रतीक्षा करावी लागली होती आणि आपल्या आप्तेष्टांना फोन करण्यासाठी टेलिफोन बूथबाहेरील लांबच लांब रांगांमध्ये तिष्ठत थांबावे लागले होते,अशा प्रकारच्या आठवणींना अनेक जण उजाळा देत आहेत. १९९० आणि त्यानंतर जन्मलेल्यांना यापैकी काहीच माहीत नसेल.पण त्यांच्या आधीच्या पिढीने असे आयुष्य खरोखर जगले आहे.

एक स्कूटर खरेदी करण्यासाठी आपल्याला किती प्रतीक्षा करावी लागली होती इथपासून ते आजच्या अगदी सहजपणे उपलब्ध असलेल्या स्कूटरपर्यंत आपण येऊन पोहोचलो आहोत. तंत्रज्ञानाचा वापर,पुरवठा साखळीचे नियोजन,परवाना यंत्रणेतील सुधारणा या घटकांनी या परिवर्तनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.सेवा क्षेत्रामध्ये आणि दैनंदिन कामांच्या बाबतीत वैयक्तिक हस्तक्षेप बऱ्यापैकी संपला आहे.त्यामुळे मध्यमवर्गीयांचे जीवन सुसह्य झाले आहे.मोठ्या देशांचा विचार करता भारत वेतन तफावतीच्या बाबतीत सर्वात वरच्या काही देशांमध्ये आहे.यामुळे असमानता अधिकच वाढत जाते.

इतिहास पाहिला तर दिसून येते की,भांडवशाही जसजशी प्रगत होत जाते,तसतसा अर्थसंकोच (संपत्ती एकवटणे)सखोल होत जातो.तंत्रज्ञानाचा वापर आणि कुशल व अकुशल मनुष्यबळातील तफावतही वाढत जाते.कुशल कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या ज्यादा मोबदल्यामुळे वेतन तफावत वाढत जाते.वर नमूद केलेले विचारात घेतले तरी विकसित व विकसनशील देशांच्या तुलनेने भारतातील वेतन तफावत ही खूपच जास्त आहे.ही आजही खरी शोकांतिका आहे.

लेखक सामाजिक कार्यकर्ते बाबु भिमराव देवकर असून समाजकार्य पदवीधर आहेत.ते आज म्हणतात..भारतीय स्वातंत्र्याची ७८ वर्षे पण आजही काही मुद्दे दुर्लक्षित दिसतात.

# परळी वैजनाथ येथे श्रावणमास तपोनुष्ठान व शिव कीर्तन सोहळयाची १७ ऑगस्टला सांगता

## शि.भ.प.रजनीताई मंगलगे यांचे प्रेरणादायक कीर्तन; भाविक मंत्रमुग्ध

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे





वीरशैव लिंगायत समाज आणि श्रावणमास तपोनुष्ठान समितीच्या वतीने आयोजित श्रावणमास तपोनुष्ठान व शिवनाम सप्ताह मोठ्या सुरू असून मंगळवार १३ ऑगस्ट रोजी अत्यंत भक्तिपूर्वक संपन्न झाला. याप्रसंगी शि.भ.प.रजनीताई मंगलगे गंगाखेडकर यांनी आपल्या कीर्तनाने उपस्थितांना भक्तिसुंदर अनुभव दिला.

या १३ दिवसीय तपोनुष्ठान सोहळ्यात अन्नप्रसाद, अखंड शिवनाम सप्ताह, परमरहस्य पारायण, कीर्तन, प्रवचन, वृक्षदान, वृक्षारोपण, जलपुनर्भरण, आरोग्य तपासणी शिबीर, सांस्कृतिक व समाज उपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.बुधवार दि.१४ ऑगस्ट रोजी गुरूवर्यांचे पुजन व महाप्रसादाचे आयोजन श्री.अमर विजयकुमारअप्पा नरवणे व श्री.सुभाषअप्पा रंगनाथअप्पा वाघमारे परीवाराच्यावतीने करण्यात आले.दररोज प्रसादाच्या कार्यक्रमास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.गुरूवर्यांची आरती नवगण कॉलेजचे प्राचार्य डॉ.मधुकर अघाव,माजी जि.प सदस्य श्री.लक्ष्मीकांतराव देशमुख,उपप्राचार्य एल.बी.घुमरे,अन्नपूर्णा चॅरीटेबल ट्रस्ट अध्यक्ष श्री.अनिल लाहोटी,एलआयसीचे डेव्हलपमेंट अधिकारी श्री.प्रमोद भालेराव यांच्यासह समाजबांधवांच्यावतीने आरती करण्यात आली तसेच तपोनुष्ठान समितीचे कार्यअध्यक्ष श्री.चंदूअप्पा उदगीर यांची नवगण कॉलेजच्या स्थानिक व्यवस्थापन सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. शिव भक्तांनी

यावर्षीच्या तपोनुष्ठान, परमरहस्य पारायण सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन द्वादश पंचम् ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या परळी-वैजनाथ नगरीतील प्रमुख पदाधिकारी आणि आयोजकांनी केले आहे.या उपक्रमाच्या यशस्वितेतून शहर व परिसरातील सर्व शिव भक्तांना अध्यात्मिक व सांस्कृतिक लाभ प्राप्त होईल,अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. या कार्यक्रमास भाविक भक्तांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे तरी जनकल्याणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या तपोनुष्ठान, परमरहस्य पारायण सोहळ्याचा शहर व परिसरातील सर्व शिव भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन द्वादश पंचम् ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या परळी-वैजनाथ नगरीतील ष.ब्र.१०८ श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या द्वादश श्रावणमास तपोनुष्ठान समितीचे अध्यक्ष चेतन सौंदळे,कार्यअध्यक्ष चंद्रकांत उदगीरकर,शाहूराव ढोबळे,उपाध्यक्ष रमेशअप्पा सपाटे,मकरंद नरवणे,प्रा.महेश्वर निर्मळे,रघुनाथअप्पा भाग्यवंत,चंदूअप्पा हालगे,संतोष पंचाक्षरी,मनोज संकाये,सचिव सोमनाथअप्पा निलंगे,सहसचिव प्रकाश खोत,शिरीष सलगरे,रवीअप्पा मिसाळ,अशोक नावंदे,दत्ता गोपनपाळे,कोषाध्यक्ष सोमनाथ गोपनपाळे,पारायण प्रमुख दयानंद चौधरी,समन्वयक संजय खाकरे,प्रा.प्रवीण फुटके,सचिन काटकर,गणपत हरंगुळे,कैलास रिकीबे,सदानंद चौधरी,रमाकांत बुरांडे,जगदीश मिटकर,गिरीष बेंबळगे,संतोष जुजगर,अतुल बेंडे प्रमुख पदाधिकारी वैजनाथ(बबन)शेटे,बबनअप्पा नाईक,गिरीष संकाये,रमेश चौधरी सर,गणेश स्वामी,संदीप चौधरी,उमाकांत पोपडे,दीपक कापसे,कपील चौधरी,अनिल मिसाळ,बाळू चौधरी,नंदू शेटे,दयानंद स्वामी,योगेश स्वामी तसेच वीरशैव समाज व श्रावणमास तपोनुष्ठान समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# अंकिता पाटील-ठाकरे यांना अहिल्यारत्न पुरस्कार प्रदान

## सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल झाला सन्मान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बारामती । बबनराव धायतोंडे



हिंदू समाज आणि मल्हार क्लब बारामती यांच्या वतीने पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त दिला जाणारा 'अहिल्यारत्न पुरस्कार' २०२४ हा पुरस्कार जिल्हा परिषदेच्या सदस्या,भाजप युवा मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा अंकिता पाटील-ठाकरे यांना प्रदान करण्यात आला.यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. हा सोहळा बारामती येथील नटराज नाट्य कला मंदिर येथे संपन्न झाला. सामाजिक बांधिलकी म्हणून काम करत असलेल्या व्यक्तींचा गौरव या कार्यक्रमात करण्यात आला.यामध्ये अंकिता पाटील ठाकरे यांचे सामाजिक योगदान बघून हा गौरव करण्यात आला आहे.भाजपाचे राष्ट्रीय नेते,माय होम इंडियाचे संस्थापक अध्यक्ष सुनील देवधर,विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे,पुणे ग्रामीण भाजपा जिल्हाध्यक्षा वासुदेवनाना काळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी अंकिता पाटील ठाकरे म्हणाल्या की,हा एक मोठा सन्मान असून,यामुळे येणाऱ्या काळात देखील समाजसेवेचे काम करण्यासाठी एक वेगळीच उर्जा मिळणार आहे.पिढ्यांनपिढ्या समाजसेवेचे हे व्रत आजही अखंड सुरू आहे. आणि हे पुढेही सुरूच राहणार आहे.आपल्या समाजरत्नांनी जी शिकवण आपल्याला दिली आहे, तीच आपल्याला येणाऱ्या पिढीला देखील देयची आहे,ते आपलं कर्तव्य आहे.यामुळे ते आपल्याला चोखपणे पार पाडायचं आहे.या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन अँड.गोविंद देवकाते,सकल हिंदू समाज व मल्हार क्लब बारामती यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता.

## आष्टा हरिनारायण शाळेस

# धनश्री बिगर शेती नागरी सहकारी पतसंस्थे मार्फत पन्नास हजार रुपयांच्या मदतीचा चेक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे



आष्टी तालुक्यातील आष्टा हरीनारायण माध्यमिक शाळेस आष्टी तालुक्यातील नामांकित व सामाजिक भान ठेवून काम करणारी धनश्री नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित आष्टीचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे आण्णा व धनश्री पतसंस्थेचे सचिव जितेंद्र शिंदे व स्वप्नील धोंडे यांच्या हस्ते आज आष्टा शाळेत आष्टा ह.ना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पठाडे उपाध्यक्ष साईनाथ गळगटे गावचे सरपंचपती गणेश माळवे,गौतम बन्सी रोकडे, गणेश गळगटे,शाळेचे मुख्याध्यापक जगताप मच्छिंद्रनाथ,रघुनाथ मुटकुळे,श्रीरंग खोकले,नामदेव भिसे,सोमनाथ वाळके,बापू शिंदे,उमेश झांबरे,राजेंद्र भागवत,डॉ.चव्हाण अनिता, द्रौपदी गवळी,सुषमा जाधव,मनिषा नाईकनवरे,तुषार पवार,दिगंबर आष्टेकर, लालासाहेब बळे,सुभाष बांगर, मधूकर धूमाळ यांच्या उपस्थित पन्नास हजार रुपयांचा चेक आज शाळेत येऊन आष्टा ह.ना.शाळेस प्रदान करण्यात आला.यावेळी पतसंस्थेचे सचिव जितेंद्र शिंदे यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की,आष्टा ह.ना. शाळेतील विद्यार्थी अतिशय गुणवंत आहेत ,शाळेने मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा उपक्रमात शाळेला आष्टी तालुक्यात प्रथम क्रमांक व बीड जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळालेला आहे.स्वच्छता शिस्त अतिशय सुंदर असून पुढील काळात शाळेचा नावलौकिक वाढावा,विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी आम्ही यात हातभार लावून मदत करत आहोत.यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमेश झांबरे सर यांनी तर सूत्रसंचालन सोमनाथ वाळके सर यांनी केले तर आभार बापू शिंदे सर यांनी मानले .

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण

# या योजनेची अंमलबजावणी प्रभावी पणे करावी-सौ.प्रणिता देवरे चिखलीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे



राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांचे आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णय भूमिका मजबूत करण्यासाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना कार्यान्वित केली आहे.

या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी अशी सूचना लोहा व कंधार आढावा बैठकी वेळी समितीच्या अध्यक्षा सौ.प्रणिताताई देवरे चिखलीकर यांनी केली.

राज्य सरकारच्या वतीने महिलांना सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संपूर्ण राज्यभर राबविण्यात येत आहे,ही योजना प्रभावितपणे राबवली जावी व योजनेची अंमलबजावणी करताना सुसूत्रता यावी तसेच कोणतीही पात्र लाभार्थी महिला या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता विधानसभा स्तरीय समिती गठित करण्यात आली या समितीची बैठक दि.१४ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय लोहा व तहसील कार्यालय कंधार या ठिकाणी समितीची बैठक समितीच्या अध्यक्षा तथा भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सौ.प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

या बैठकीत शासनाच्या वतीने जी महत्त्वकांक्षी योजना राबवली जाणार आहे त्याचा फायदा सर्वसामान्य लाभार्थी महिलांना व्हावा व आर्थिक दृष्ट्या कुटुंबातील महिला सक्षम व्हावी यासाठी सर्वांनी समितीच्या सदस्यांनी शर्तीचे प्रयत्न करावेत व त्याचा लाभ सर्वसामान्याला मिळाला पाहिजे, तसेच या योजनेपासून कोणतीही महिला भगिनी वंचित राहू नये यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे या बैठकीदरम्यान समितीच्या अध्यक्षा प्रणिताताई देवरे चिखलीकर यांच्यासह उपस्थित समितीच्या शासकीय व अशासकीय सदस्यांनी सूचना केल्या.

यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अशासकीय ड.गंगाप्रसाद यन्नावार,ड मारुती पंढरे,तहसीलदार रामेश्वर गोरे,महेश पाटील गट विकास अधिकारी कंधार, लिंगुराम राजुरे बालविकास प्रकल्प अधिकारी कंधार,मोकले नायब तहसिलदार लोहा,दशरथ आडेराघो गटविकास अधिकारी लोहा, श्रीमती पवार बालविकास प्रकल्प अधिकारी लोहा,श्रीमती एस के वानखेडे सहाय्यक गट विकास अधिकारी लोहा यांच्यासह भाजपा लोहा तालुकाध्यक्ष आनंदराव पाटील शिंदे,भाजपा कंधार तालुकाध्यक्ष प्रा. किशनराव डफडे,माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार,नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष दत्ता वाले,मधुकर डांगे,ड सागर डोंगरजकर, सुरेश गायकवाड,प्रदीप मंगनाळे,माधव तांबोळी यांची उपस्थित होती.

# जि.प.शाळा पिंपळदरी येथे पत्रकार संदेश कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम राजा



पिंपळदरी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पिंपळदरी येथे हर घर तिरंगा घरघर तिरंगा अभियानांतर्गत ध्वजारोहणाचा कार्यक्रम व गणवेश वाटप पार पडला, पत्रकार लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजाचा आरसा आहे,पत्रकार आपल्या लिखाणा मधून समाजातील समस्या शासन स्तरावर मांडण्याचे काम करत असतो,याची जाणीव जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, शाळा समिती अध्यक्ष, यांनी पत्रकारिता क्षेत्रातील सामाजिक कार्याची दखल घेऊन प्रेस संपादक पत्रकार सेवा संघाचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष नमो महाराष्ट्र वृत्तपत्राचे पत्रकार संदेश कांबळे यांच्या हस्ते शाळेमधील ध्वजारोहणाचा मान देऊन पत्रकार संदेश कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, याप्रसंगी मुळावा केंद्राचे केंद्रप्रमुख अनिल बर्डे सर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शंकर मासोळकर, गावचे प्रथम नागरिक सरपंच बंडूभाऊ ढाकरे, तंटामुक्ती अध्यक्ष सुभाष ढाले, माजी उच्च श्रेणी मुख्याध्यापक अरुण ठाकरे सर,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सखाराम आमटे शाळेचे मुख्याध्यापक सुरेश देशमुख सर, पदवीधर शिक्षक श्री खंडाळे सर , फरहान मॅडम, श्री पोफाळकर सर, श्री पाठक सर बाळासाहेब येडे सर उपस्थित होते,

# सेट परीक्षेच्या निकालात सचिन दाढेल अर्थशास्त्र या विषयात उत्तीर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे



सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांच्या वतीने एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत सचिन व्यंकटी दाढेल अर्थशास्त्र या विषयात उत्तीर्ण झाले आहेत. सेट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. सध्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.येथे अर्थशास्त्र या विषयात त्याचं संशोधन(झ.हव) ही चालू आहे. हालाकीच्य परिस्थितीवर मात करून सचिन कष्टाने शिक्षण घेतले आई-वडील दोन्हीही निरक्षर आहेत मोलमजुरी करून आपले व आपल्या कुटुंबाचा गडा हकत असतात पण जिद्दचिकाटीच्या जोरावर सचिनने सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहे.आपले व आपल्या आई वडिलांचे नाव नौवलौकीक केले आहे . अर्थशास्त्रासारख्या अवघड विषयांमध्ये सेट परीक्षा पास होणे खूप अवघड असते पण जिद्द व चिकाटीच्या जोरावर आपण यश संपादन करू शकतो हे सचिन ने करून दाखवले आहे उत्तीर्ण झाल्यामुळे सहाय्यक प्राध्यापक म्हणून ते पात्र झाले आहेत. निकाल जाहीर होताच मातंग समाजाचे नेते गणपतराव भिसे,प्रा,भगवानराव लोकडे सर,लोकप्रिय नगरसेवक करिमभाई शेख, पुंडलीक काशिनाथ दाढेल, विठ्ठल दाढेल, नागनाथ दाढेल, सुरेश दाढेल,मारोती (छोटू)दाढेल,किशन दाढेल, प्रा.संतोष दाढेल,पत्रकार शिवराज दाढेल लोहेकर,त्यांचं अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# राज्यात एकच लाडका शिल्लक राहिला एकटा जीव सदाशिव

**हिंगोली (वृत्तसंस्था)**–राज्यातील लाडक्या बहिणीसाठी, भावासाठी तसेच जेष्ठांसाठी शासनाने योजना आणल्या आता कोणीही शिल्लक राहिले नाही पण एकच लाडका शिल्लक राहिला अन् त्याचा एकटा जीव सदाशिव आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (ता.१२) हिंगोलीत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर नांव न घेता टिका केली.हिंगोली येथे आमदार संतोष बांगर यांच्या नेतृत्वाखाली चिंचाळेश्वर महादेव कळमनुरी ते ओम कयाधू अमृतधारा महादेव हिंगोली या १८ किलोमीटर अंतराची कावड यात्रा काढण्यात आली. त्यानंतर सायंकाळी हिंगोलीच्या नांदेड नाका येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाविकांना मार्गदर्शन केले. यावेळी शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख आनंदराव जाधव, माजी खासदार हेमंत पाटील, आमदार संतोष बांगर, बालाजी कल्याणकर, राम कदम, ड. अविनाश बांगर यांची उपस्थिती होती.यावेळी बोलतांना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यातील बळीराजा, शेतकरी आनंदी व सुखी झाला पाहिजे असे भगवान शंकराकडे साकडे घातले आहे.

# दि.२५ ऑगस्ट २०२४ ला नगर येथे वंजारी महा संघाचे दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन

## समाजभान समृद्ध करणारे दुसरे सक्षम पाऊल:मावळते अध्यक्ष प्रा.वा.ना.आंधळे यांचं मत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



वंजारी समाज हा महाराष्ट्रासह काही राज्यात वास्तव्यास असून अतिशय संघर्षातून व कष्टातून वाट काढीत स्वतःची ओळख निर्माण करीत आलाय. वर्तमानी समाज स्तर शिक्षणाने उंचावलाय हे जरी खरे असले तरी समाजातील शेतकरी शेतमजूर व शिक्षित बेरोजगार सांख्यिकी दृष्ट्या खूप आहेत.अशा वंचित घटकास न्याय मिळावा व तो बरोबरीने यावा यासाठीच्या प्रयत्नांचा भाग म्हणून संमेलनाचे सदरचे आयोजनअसल्याचे मत पहिल्या संमेलनाचे मावळते अध्यक्ष महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी आमच्या प्रतिनिधिकडे व्यक्त केले.

ते आपल्या मनोगतात पुढे म्हणाले की,सहित्याचं ऋण अवघ्या मानव जातीवर असून साहित्यामुळेच मानवी जीवन आणि मन प्रत्येक काळात उन्नत होत गेलंय. यातून मिळणारा आनंद दृढ व्हावा व समाजभान समृद्ध व्हावे.यासाठी संमेलनाचे हे दुसरे सक्षम पाऊल आहे असे सांगत संमेलनास समाजातल्या बंधू भगिनींना उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.अहिल्यानगर शहरातील निर्मलनगर परिसरात संत भागवनवबाब चौकात गंगा लॉन्सवर दि२५ ऑगस्ट२०२४ रोजी सकाळी ९वाजेपासून सायंकाळी ६वाजेपर्यंत होणाऱ्या साहित्य संमेलनात साहित्य दिंडी,उदघाटन समारंभ कथाकथन, परिसंवाद, कविसंमेलन यातून वाङ्मयीन मेजवानी मिळणार असल्याचे वांजरी महासंघ महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष मा. श्री. गणेशजी खाडे यांनी सांगितले.संमेलनाचे अध्यक्ष नांदेड येथील सुप्रसिद्ध साहित्यिका मा.प्रा.डॉ.सौ.संगीताताई घुगे व उदघाटक डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा. प्रा.डॉ.गजाननराव सानप यांचे सह प्रमुख मान्यवर म्हणून नगरचे पालक मंत्री मा.राधाकृष्ण विखे पाटील,खासदार मा. निलेश लंके,माजी खासदार मा. सुजय विखे पाटील,आमदार मा. संग्राम जगताप, शिर्डीचे खासदार मा. भाऊसाहेब वाघचौरे,माजी खासदार मा. सदाशिव लोखंडे,माजी महसूल मंत्री मा. बाळासाहेब थोरात, माजी मंत्री मा. प्राजक्त तनपुरे,आमदार मा. मोनिकाताई राजळे,मा.रोहित पवार,मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ.नवनाथ आघाव,वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुप्रसिद्ध विचारवन्त साहित्यिक मा. गणेशजी खाडे, पहिल्या मराठी साहित्य संमेलनाचे मावळते अध्यक्ष सुप्रसिध्द कवी मा. प्रा.वा.ना.आंधळे तसेच नाशिक येथील सुप्रसिद्ध उद्योजक मा.बुधाजीराव पानसरे या मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती असणार आहे. सदर संमेलन सर्वार्थाने यशदायी व्हावे म्हणून संमेलनाचे स्वागताध्यक्ष विश्वविजेते कुस्ती खेळाडू मा.राजकुमार आघाव पाटील, सह स्वागताध्यक्ष रेणुका वराडे,सह स्वागताध्यक्ष घनश्याम बोडके,निमंत्रक जिल्हाध्यक्ष मल्हारी खेडकर, युवा जिल्हाध्यक्ष अर्जुन वायभासे प्रयत्नांची सरशी करीत आहेत.

# श्रावणी सोमवार निमित्त संगित भजन स्पर्धांचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मयूर ढोबळे । ओतूर**



श्री कपर्दिकेश्वर यात्रेनिमित्त दुसरा श्रावणी सोमवार निमित्त ओतूर या ठिकाणी सालाबादप्रमाणे कै. रामचंद्र भाऊसाहेब डुंबरे उर्फ बबन सर यांचे स्मरणार्थ भव्य संगीत भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील वीस नामवंत संगीत भजन मंडळ सहभागी झाली होती. या स्पर्धेत प्रथम क्रमांकास सोळा हजार रुपये , द्वितीय क्रमांकास तेरा हजार रुपये, चतुर्थ क्रमांकास अकरा हजार रुपये आणि उत्तेजनार्थ क्रमांकास सात हजार सातशे रुपये बक्षिस ठेवण्यात आले होते. अशी माहिती कपर्दिकेश्वर देव धर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे यांनी दिली.या स्पर्धेत बक्षिसे मिळविले संघ पुढीलप्रमाणे – पहिला क्रमांक विभागून –सोहम संगित भजन मंडळ घोडेगाव,स्वरांजलि संगित भजन मंडळ पिंपरी पेंढार , भैरवनाथ संगित भजन मंडळ केंदूर पाबळ , तांबेश्वर भजन मंडळ जोशीवाडी तांबे दुसरा क्रमांक विभागून खंडेराया प्रासादिक भजन मंडळ अवसरी( टावरेवाडी ), वरसुबाई भजन मंडळ वरसवणे( तांबे ), वरसुबाई भजन मंडळ जावळेवाडी –२, जय हनुमान भजन मंडळ भोईरवाडी तिसरा क्रमांक विभागून– पुष्पेश्वर भजन मंडळ पिंपळगाव जोगा, वरसुबाई भजन मंडळ घंगाळदरे, महालक्ष्मी भजन मंडळ रोहोकडी, वरसुबाई भजन मंडळ हिवरे पठार . चतुर्थ क्रमांक विभागून –शिवचैतन्य भजन मंडळ जांभळे ( जावळेवाडी ) , मुक्ताई भजन मंडळ पाचघर , केवडदरा भजन मंडळ कोळवाडी, भैरवनाथ संगित भजन मंडळ तळेरान उत्तेजनार्थ – जय हनुमान भजन मंडळ जांभुळशी, तांबेश्वेर भजन मंडळ भांगेवस्ती , धाविरबाबा भजन मंडळ वरसावणे ( आंबेगाव) या भजन स्पर्धेसाठी शांताराम पानसरे, राजेंद्र डुंबरे छबुराव तांबे , अनिल डुंबरे , रोहीदास घुले, भास्कर डुंबरे,अविनाश ताजणे, बाळासाहेब डुंबरे, ज्ञानेश्वर पानसरे,सुनिल डुंबरे , धनंजय डुंबरे,पाटीलबुवा ढमाले , संदेश साळुंखे, बबन तांबे ,सिताराम डुंबरे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. या भजन स्पर्धेचे संयोजन कपर्दिकेश्वर देव धर्म संस्थेचे माजी सचिव जी. आर . डुंबरे पाटील व खजिनदार संजय डुंबरे यांनी केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून संतोष झावरे व मंगेश कोंडार यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी केले व आभार जी. आर. डुंबरे यांनी मानले.

# निवडणुकापुरतेच लोकांत जाणाऱ्यांना जनता माफ करणार नाही–जयदत्त धस

## जयदत्त धस यांनी युवा संवाद दौऱ्यात संपूर्ण मतदारसंघ काढला पिंजून

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



निवडणुका येतात जातात परंतु जनसामान्यापर्यंत आपण चांगले संपर्क ठेवले पाहिजेत निवडणुकीपुरतेच लोकात जाणं हे जनता माफ करत नाही परंतु आमचं धस कुटुंबीय प्रत्येकाच्या सुखदुःखात धावून जातात म्हणून जनता हे आम्हाला विसरत नाही असे मत आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे युवा नेतृत्व जयदत्त भैय्या धस यांनी व्यक्त केले घाटा पिंपरी येथे युवा संवादक दौरा आयोजित केला होता त्यावेळेस गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले पुढे बोलताना ते म्हणाले की ज्यांना पिक विमा मिळाला नाही त्यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे तकार अर्ज दाखल करावेत या तक्रारीचा निरंकारण करण्यासाठी मी सदैव तत्पर राहील असे ते म्हणाले यावेळी गावातील छोटे–मोठे विविध प्रश्नावर माजी सरपंच गोवर्धनतळेकर व विनायक मुळीक यांनी गावातील समस्या सांगून त्याबाबत काही उपाय योजना करण्यात येत असेल तर करा असेही त्यांना सांगितले घाटा येथील ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार व फटाक्याचे आतषबाजी करत त्यांची जंगी स्वागत केले या कार्यक्रमाला सरपंच प्रल्हाद मुळीक धामणगाव शामा आबा तळेकर कडा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सरपंच मनोजशेठ गाढवे माजी उपसरपंच सदाशिव घुमरे माजी सरपंच गोवर्धन तळेकर माजी उपसरपंच अमोल तळेकर ज्येष्ठ नेते विनायक भाऊ मुळीक बाळासाहेब कांबळे अल्ताफ शेख अशोक बायकर रवी बायकर गोटीराम झांजे अशोक तळेकर व शाहु कोकरे सह मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार सुरेश कांबळे यांनी केली

# चांडोहतील गावडे विद्यालयाच्या विद्यार्थ्यीनींकडून एक राखी सैनिकांसाठी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**



शिरूर तालुक्यातील ग्रामीण शिक्षण मंडळाच्या बापूसाहेब गावडे माध्यमिक विद्यालय चांडोहतील विद्यार्थीनींनी एक राखी सैनिकांसाठी उपक्रमा अंतर्गत तब्बल दोनशे राख्या स्वतः तयार करून देशाच्या सिमेवर रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी दि.१४ रोजी सुपुर्त केल्या.मेजर संतोष धोंडिभाऊ पानमंद यांनी या राख्यांचा स्वीकार करून ते जम्मू काश्मीर येथील देशाच्या सिमेवर तैनात बटालियन कडे रवाना झाले.

गावडे विद्यालयात स्वातंत्र्याचा अमृत मोहत्सव प्रसंगी बुधवारी सकळी चांडोह गावचे सुपूत्र मेजर संतोष पानमंद यांनी मानवंदना देऊन ध्वजरोहन केले तसेच उपस्थित मान्यवरांसमवेत विद्यार्थ्यांनी ध्वजाला सलामीदेत ध्वजगीत सादर केले.तदनंतर झालेल्या कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते दहावीच्या मुलींनी तयार केलेल्या राख्या मेजर पानमंद यांना मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान केल्या.या कामी मुख्याध्यापक विलास घोडे यांनी एक राखी सैनिकांसाठी या उपक्रमासाठी केलेल्या आवाहनाला साद देत शिक्षिका प्रियंका सुपे,निलम कानसकर यांसह सर्व शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाखाली मुलींनी मोठ्या उत्साहाने राख्या तयार केल्या होत्या. यावेळी शिरूर तालुका खरेदी विक्री संघ संचालक संपत पानमंद,प्रसिद्ध गाडा मालक शरद खराडे,पोलीस पाटील सुदर्शन भाकरे,सोसायटी व्हाईस चेअरमन नामदेव शिंदे,सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग सालकर,प्रगतशील शेतकरी रखमा शेलार,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रय गोडसे,ज्येष्ठ शिक्षक अशोक गाडिलकर,नवनाथ राऊत, संभाजी खोडदे,नवनाथ लाळगे,बबन चोरे,प्रविण कांदळकर,दादाभाऊ पानमंद,सुरेश गावडे ,पत्रकार मारुती पळसकर यांसह ग्रामस्थ,विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष नऱ्हे यांनी तर आभार अशोक गाडिलकर यांनी मानले.

# ग्रामपंचायत कार्यालय पेठवडजची घंटा गाडी म्हणजे नसुन वळंबा असुन खोळंबा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



पेठवडज हे इतिहासातील तथा निजामशाही राजवटीत एक नावाजलेले गाव आहे थोडक्यात कंधार नंतर दोन क्रमांकाची बाजारपेठ आहे. संबंधित गावात १७ ची बॉडी असुनही कुठल्याही प्रकारची कामे होत नाहीत. अगदी साधे स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती ची सोय ह्या ठिकाणी पुर्ण होतांना दिसत नाहीत. श्रावण महिन्याच्या पवित्र महिन्यात महादेव – दत्त मंदिर – मारोती मंदिर – वेस असा चौकोनी संगमाच्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य झाले आहे. रस्तात घोट्या एवढ पाणी साचत आहेत यामध्ये चिकुनगुनिया ,डेंग्यू सारख घातक असणार्या डासांची पैदास वाढून संबंधित भागातील लोकांना डेंग्यू ची साथ पसरण्याची दाट शक्यता आहे. उद्या १५ ऑगस्ट निमित्त उद्या गावातुन प्रभातफेरी निघते अन् ह्याच घाणीतून उद्याचे भावी नागरिक होणारे बालमित्रांना जावं लागतं ही बाब ग्रामपंचायत ला वेळोवेळी सुचना करून ही सुधारणा होत नसल्याने ग्रामस्थ त्रस्त आहेत. याची चर्चा गावभर आहे. शेवटी वैतागून, कंटाळून गेलेल्या होळीनगर परिसरातील तरूणांनी हातात झाडू घेऊन स्वच्छता केली. यावरून ग्रामपंचायत ही आपल्या जिम्मेदारी पासून दुर जात असताना बालाजी फील्ड वेअर संस्थेने मदतीचा हात समोर केला अन् आज घडीला तिथला प्रश्न जय हनुमान मित्र मंडळ व समस्त होळीनगर बांधव आणि बालाजी फिल्डवेअर च्या माध्यमातून सुटला असला तरी ग्रामप्रशासन मात्र आपल्या जिम्मेदारी पासून अलिप्त आहे.याबद्दल लोकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहे. यावेळी स्वच्छता करताना, जय हनुमान मित्र मंडळांचे पदाधिकारी व समस्त होळीनगर परिसरातील बांधव उपस्थित होते.

# मुप्टा जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिरसमार्ग येथे शरद मगर यांचा सत्कार संपन्न




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

मुप्टा शिक्षक संघटना बीड जिल्हा जिल्हाध्यक्षपदी शरद दुष्यंत मगर यांची निवड झाल्याबद्दल श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने संस्थेचे सचिव मा सुभाषराव पवळ व समर्थ विद्यालय शिरसमार्ग शाळेतील सर्व कर्मचारीच्यावतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव मा.सुभाषराव पवळ माजी मुख्याध्यापक मोहनराव पवळ,भारत तांबारे,भारत मगर ,बेद्रे सर काशीद सर ,दाभडगावकर सर शिंदे सर ,आहेर सर जमदाडे सर टाकसाळ सर,कारंडे सर कात्रजकर सर ,खोसे सर, सचिन रडे ,बाबु रडे ,अशोक चिखले यांची उपस्थिती होती.

# खळबळजनक लोणार नगर पालिकेचा कर निरीक्षक अनवर शहा लाच घेताना अटक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई हकिकत अशी कि यातील तक्रारदार यांनी सन २०११ मध्ये लोणार हद्दीतील प्लॉट खरेदी केला होता.सदर प्लॉट ची नगर परिषद लोणार येथे रजिस्टर नोंद घेवून नविन मालमत्ता क्रमांकाची नक्कल मिळविण्याकरीता लोकसेवक अनवर शहा कासमशा फकिर हे २५००० हजार लाचेची मागणी करित असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा यांचेकडे प्राप्त झाली होती.त्यानूसार दिनांक १३/०८/२०२४ रोजी लाच पडताळणी कार्यवाही आयोजित केली असता.लोकसेवक अनवर शहा नगर पालिका लोणार यांनी सदर प्लॉटवरची कर आकारणी करुन त्या प्लाटची असेसमेंट नक्कल देण्याकरीता २५०००/रुपये लाच मागणी करून तडजोड अंती २००००/रुपये लाचेची रक्कम स्विकारण्या वरून रंगेहाथ पकडण्यात आले.त्यावरून आरोपीला ताब्यात घेऊन त्यांचे विरूध लाच स्वीकारन्या बाबत पोलिस स्टेशन लोणार येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.



सदर कारवाई मा.श्री.मारूती जगताप पोलिस अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावती, .श्री.अनिल पवार पोलिस अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो परिक्षेत्र अमरावती, यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधीकारी श्रीमती शितल घोगरे पोलीस उपअधीक्षक,व सापळा मदत पथक सपो.श्याम भांगे,पो.हे.कॉ.प्रवीण बैरागी,पो.ना.विनोद लोखंडे,पो.कॉ.रंजीत व्यवहारे,म.पो.कॉ.स्वाती वाणी,ना.पो.कॉ.नितीन शेटे,चालक पो.कॉ.अरशद शेख ॲन्टि करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी पार पाडली. शासकीय लोकसेवकांनी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अँनटी करप्शन ब्युरो बुलढाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ९६५७६६४५५ तसेच टोलफ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधीक्षक अँटी करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी केली आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904